<u>नि.दि.दा.क्र.२६२/२०११.</u>
नि.क्र.१०९ लगत.
दि.१२.१२.२०२५

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा शपथेवर जबाबः–</u>**

**नाव :– सुरेश काशिनाथ जाधव.**

४. <u>माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/–

**(एस.ए.विराणी)**

दि. १२.१२.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

**<u>प्रतिवादींतर्फे साक्षीदाराचा पुढील उलटतपास विद्वान विधीज्ञ श्री. आर. के. भिसे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

५. हे म्हणणे खरे आहे की, मी कायमस्वरुपी दौंड शहरात राहण्यास आहे. हे म्हणणे खरे आहे की, १९९५ पासून मी वकिली व्यवसाय करत आहे. माझी सनद १९९४ सालची आहे. नेमकी तारीख मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादातील दस्त तयार झाला त्यावेळी मी वकीली व्यवसाय करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यात साक्ष देण्यासाठी मला वादींनी सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अपरोक्ष वादीच्या वकीलांनी माझा प्रतिज्ञापत्र तयार करुन ठेवले होते. हे म्हणणे खरे आहे की, केडगावमध्ये माझे वकीलीचे ऑफिस नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नेहमी इंग्रजी भाषेतच सही करतो. साक्षीदार म्हणतो, मी मराठी आणि इंग्रजी भाषेत सही करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला वादातील दस्त करण्यापूर्वी ओळखत नव्हतो. साक्षीदार म्हणतो, मी मीना मगर यांना व्यक्तीशः ओळखत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी मिनाक्षी मगर यांना ओळखत नव्हतो आणि वादातील दस्ताचे काम माझ्याकडे अॅड. वाय. एस. शिंदे यांच्यामार्फत आले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादीने दस्तातील क्षेत्र १ हेक्टर २० आर असे सांगितल्यानुसार ते मी दस्तात नमूद केलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, दस्तातील सर्व मजकूर मी वादीच्या सांगण्याप्रमाणे नमूद केलेला आहे व तो वादीला वाचून दाखवून त्यावर त्यांच्या सह्या घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, १९९६ साली मी गोपा भिवा ठाकर आणि प्रभू भिवा ठाकर यांना मी ओळखत नव्हतो. दस्त करतेवेळी लिहून देणार यांच्याव्यतिरिक्त त्यांच्या कुटुंबातील

इतर व्यक्ती हजर होते अगर कसे याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादातील साठेखताचा दस्त कोणत्या तारखेला व किती वाजता नोंदविण्यात आला हे मी आता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादातील दस्तावर माझी ओळख देणार म्हणून सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादातील दस्तावर लिहून घेणार यांनी किती ठिकाणी सह्या केल्या हे मी सांगू शकत नाही. साक्षीदार म्हणतो, आवश्यक त्या ठिकाणी घेतलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादातील दस्त नि. ७८ वर लिहून घेणार यांची सही दिसून येत नाही.  हे म्हणणे खरे आहे की, नि. ७८ वरील पान नं. ६ वर गोपा ठाकर आणि प्रभु भिवा ठाकर यांचे अंगठे कोणी बांधले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी दि. २७.०६.१९९६ रोजी केडगाव येथील सबरजिस्ट्रार कार्यालयात हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. १ मधील मजकूर की, वादी प्रतिवादी केडगाव येथे दस्त करण्याकरिता आले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी प्रतिवादीच्या सांगण्यानुसार दस्त तयार केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने स्टॅम्प खरेदी केला हेदेखील मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझे ओळखीचे असल्यामुळे त्यांना मदत करण्याकरिता मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड.
जि. पुणे.

दिनांकः- १२.१२.२०२५